मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482

विश्वविक्रमी सोहळ्याचा 'ब्लॉकबस्टर' मयूर अहेर!

रील स्पर्धेत एक लाखांचे बक्षीस; ७५० स्पर्धकांचा सहभाग

» पिंपरी | प्रतिनिधी

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे जगातील सर्वांत उंच स्मारक "स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण" आणि निर्माणाधीन भगवा धर्मध्वज यांना ढोल-ताशांच्या ऐतिहासिक विश्वविक्रमी मानवंदना सोहळ्याचे क्षण सर्जनशील रीलच्या माध्यमातून समाजमाध्यमांवर पोहोचविणाऱ्या रील निर्मात्यांच्या हिंदूभूषण स्मारक ट्रस्टतर्फे गौरव करण्यात आला. ट्रस्टतर्फे आयोजित खुल्या रील स्पर्धा-२०२६ मध्ये नाशिक येथील मयूर अहेर यांनी प्रथम क्रमांक पटकावला. त्यांना एक लाख रुपयांची रोख रक्कम, स्मृतीचिन्ह आणि भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

> "धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जगातील सर्वात उंच शिल्पाला ढोल-ताशा पथकांच्या मानवंदनेचा सोहळा जगभरात पोहोचवण्यासाठी रील निर्मात्यांनी पुढाकार घेतला. वास्तव आणि सत्य दाखवणारे रील स्टार खऱ्या अर्थाने 'रिअल स्टार' आहेत. सशक्त राष्ट्र आणि त्या राष्ट्रातील सशक्त तरुण घडवण्यासाठी, राष्ट्रभक्ती जागृत करण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेतला पाहिजे."
> -महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून दि.४ ऑक्टोबर रोजी झालेल्या ऐतिहासिक मानवंदना सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. त्याची नोंद गिनीज बूक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये झाली. त्या सोहळ्यानिमित्त आयोजित 'ब्लॉकब्लास्टर रील' स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ आणि स्नेहमेळावा शनिवारी (दि. २४ ऑक्टोबर) मोशी येथील सीझन्स बँक्वेट येथे पार पडला. यावेळी कामगार नेते सचिन लांडगे, उद्योजक कार्तिक लांडगे, हिंदूभूषण स्मारक ट्रस्टचे सदस्य प्रतापराव मोहिते, पृथ्वीराज लांडगे, सुहास ताम्हाणे आदी उपस्थित होते.

> ""रीलस्टार' म्हणजे उद्याचा भारत घडवणारे युवक आहेत. देव-देश-धर्म आणि संस्कृती जपण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेतला पाहिजे. रील स्पर्धेमुळे शिव-शंभू विचार जगातील कानाकोपऱ्यात आणि नव्या पिढीपर्यंत पोहचणार आहेत. आता वारकरी सांप्रदायामध्ये पवित्र असलेली इंद्रायणी नदी प्रदूषण आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी आम्ही "इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन"चे आयोजन करतो. या उपक्रमातही रील निर्मात्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करतो."
> -सचिन लांडगे, कामगार नेते.

हिंदूभूषण स्मारक ट्रस्टचे सचिव प्रसाद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या स्पर्धेत महाराष्ट्रासह अन्य राज्यातील ७५० हून अधिक रील निर्मात्यांनी सहभाग नोंदवला होता. यामुळे हा सोहळा जगभरात पोहाचला. त्यासोबतच महाराष्ट्रभरात शिव-शंभूप्रेमींनी सोशल मीडियावर तुफान प्रतिसाद दिला आहे. पारितोषिक वितरण समारंभाला ६०० हून अधिक स्पर्धत उपस्थित राहीले. त्यामुळे हा सोहळा अत्यंत दिमाखात संपन्न झाला. आमदार लांडगे यांनी सर्व पारितोषिक विजेत्या रिल निर्मात्यांचे अभिनंदन केले.

उद्योजक कार्तिक लांडगे म्हणाले की, " घरातील आई आणि गोठ्यातील गाई माझ्यासाठी समान पूजनीय आहे" या भावनेतून आमदार महेश लांडगे काम करीत आहेत. देव-देश-धर्म आणि संस्कृती जपण्यासाठी प्रखर भूमिका आणि त्याला आयआयएम, सीईओपी, न्यायालय इमारत आणि संविधान भवन उभारणीसाठी त्यांनी यशस्वी पाठपुरावा केला. 'विकासाभिमूख हिंदुत्वा'च्या या कार्यात सर्व रील निर्माते आणि नेटिझन्सची साथ द्यावी.

पुरस्काराचे मानकरी!

या स्पर्धेत यश कदम यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. त्यांना ७५ हजार रुपयांचे पारितोषिक प्रदान करण्यात आले. तृतीय क्रमांकाचे मानकरी जय गाडे यांना ५० हजार रुपये, चतुर्थ क्रमांक विजेत्या हिंदवी भोसले यांना २५ हजार रुपये, तर पाचवा क्रमांक मिळविणाऱ्या प्रणव यांना १० हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. पहिल्या पाचही विजेत्यांना रोख रकमेसह स्मृतीचिन्ह आणि भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. या विजेत्यांना एकूण २ लाख ६० हजार रुपयांची रोख पारितोषिके प्रदान करण्यात आली. तसेच, सहभागी सर्व रिल निर्मात्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

मोहननगरमध्ये जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा; पाच जणांना अटक

» पिंपरी | प्रतिनिधी

चिंचवड येथील संघवी कॉलेज चौक, मोहननगर परिसरातील मोकळ्या जागेत विनापरवाना तीन पत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या पाच जणांवर पिंपरी पोलिसांनी कारवाई केली. शुक्रवारी (दि. २३ ऑक्टोबर) सायंकाळी ५.२० वाजण्याच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळावरून १ हजार ११० रुपये रोख रक्कम आणि जुगाराचे साहित्य जप्त केले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी पैशांची बाजी लावून बेकायदेशीररीत्या तीन पत्त्यांचा जुगार खेळत असल्याचे आढळून आले. यानंतर पोलिसांनी कारवाई करत पाचही जणांना ताब्यात घेतले. या प्रकरणी महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम कलम १२ (अ) नुसार पिंपरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कारवाईत हनुमंत माणिक कांबळे (वय २६), प्रवीण बाबुराव कसबे (वय ३६), देवीदास आदिक मोरे (वय ४५), शिवाजी गंगाराम पाळेकर (वय ६३) आणि महेश जालिंदर कांडेकर (वय ३६) यांच्यावर कारवाई करण्यात आली. या प्रकरणी पोलीस हवालदार राजेंद्र बारसिंगे यांनी फिर्याद दिली आहे. पुढील तपास पिंपरी पोलीस करीत आहेत.

मोशीतील बोराटेवस्तीत विजेचा लपंडाव; नागरिक त्रस्त!

वीजपुरवठ्यातील चढ-उतारामुळे उपकरणांना धोका; भूमिगत करण्याची नागरिकांची मागणी

» पिंपरी | प्रतिनिधी

मोशी परिसरातील बोराटेवस्ती येथे गेल्या अनेक महिन्यांपासून वीजपुरवठ्याच्या समस्येने नागरिक त्रस्त झाले आहेत. परिसरात वारंवार वीजपुरवठा कमी-जास्त होत असल्याने दैनंदिन कामकाजावर परिणाम होत आहे. नियमित आणि सुरळीत वीजपुरवठा मिळत नसल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून, या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी जोर धरू लागली आहे. वारंवार उद्भवणाऱ्या या समस्येकडे संबंधित विभागाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

> “बोराटेवस्तीचा भाग पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत सन १९८६ ला समाविष्ट करण्यात आला आहे. मात्र वीजपुरवठ्यातील समस्येतून येथील स्थानिक नागरीकांची अद्यापपर्यंत सुटकाच झालेली नाही. येथील वीज पुरवठा सुरळीत व योग्य दाबाने करून संपूर्ण परिसरातील वीज वाहिन्या भूमिगत करण्याची तातडीने आवश्यकता आहे.”
>
> -संतोष बोराटे,
> स्थानिक नागरीक

बोराटेवस्ती परिसरात वीजपुरवठ्यात होणाऱ्या चढ-उतारांमुळे घरगुती विद्युत उपकरणांचे नुकसान होण्याची भीती नागरिकांना सतावत आहे. पंखे, फ्रिज, टीव्ही, संगणक यांसारख्या उपकरणांच्या कार्यक्षमतेवर अशा प्रकारच्या अनियमित वीजपुरवठ्याचा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे नागरिकांना आर्थिक नुकसान सहन करावे लागण्याची शक्यता आहे. वीजपुरवठा सुरळीत नसल्याने घरातील दैनंदिन कामे करतानाही अडथळे निर्माण होत आहेत. विशेषतः घरातून काम करणाऱ्या नागरिकांना या समस्येचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे.

आजच्या काळात बहुतांश घरांमध्ये दैनंदिन कामांसाठी विजेवर चालणाऱ्या उपकरणांचा वापर केला जातो. अशा परिस्थितीत वीजपुरवठ्यात वारंवार चढ-उतार झाल्यास नागरिकांची गैरसोय होते. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांनाही याचा त्रास सहन करावा लागत आहे. वीजपुरवठ्याच्या अनियमिततेमुळे कामांचे नियोजन बिघडत असून, नागरिकांना सतत विजेच्या स्थितीकडे लक्ष ठेवावे लागत आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून ही समस्या कायम असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. वीजपुरवठ्यातील चढ-उतारांचे नेमके कारण काय, याची तपासणी करून संबंधित यंत्रणेतील दोष दूर करणे आवश्यक आहे. केवळ तात्पुरती दुरुस्ती करण्याऐवजी भविष्यात अशा समस्या उद्भवू नयेत, यासाठी महावितरणने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

बोराटेवस्ती परिसरातील वीजपुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासोबतच वीजवाहिन्या भूमिगत करण्याची मागणीही नागरिकांकडून करण्यात येत आहे. परिसरात वाढत असलेली लोकवस्ती आणि नागरीकरण लक्षात घेता वीज वितरण यंत्रणेचे नियोजनबद्ध आधुनिकीकरण करणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. भूमिगत वीजवाहिन्यांमुळे उघड्या तारांमुळे निर्माण होणारे संभाव्य धोके कमी करण्यास मदत होऊ शकते. मात्र, त्यासाठी संबंधित विभागाने तांत्रिक व्यवहार्यता तपासून आवश्यक नियोजन करणे गरजेचे आहे.

परिसरातील वीज वितरण यंत्रणेची प्रत्यक्ष पाहणी करून वाहिन्या, जोडण्या आणि संबंधित उपकरणांची स्थिती तपासावी. वीजपुरवठ्यातील चढ-उतार नेमके कोणत्या कारणामुळे होत आहेत, याचा शोध घेऊन आवश्यक दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. तसेच भविष्यातील वाढती वीजमागणी लक्षात घेऊन वितरण यंत्रणेची क्षमता वाढविण्याची गरज आहे का, याचाही आढावा घेणे आवश्यक आहे.

वीज ही नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील अत्यावश्यक गरज आहे. त्यामुळे बोराटेवस्ती परिसरातील वीजपुरवठा नियमित आणि सुरळीत ठेवण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणेची आहे. अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या समस्येवर तोडगा निघत नसल्याने नागरिकांच्या अडचणी वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर महावितरणने तातडीने दखल घेऊन प्रत्यक्ष पाहणी करावी, तांत्रिक दोष दूर करावेत आणि वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी ठोस कृती आराखडा तयार करावा, अशी मागणी होत आहे.

तसेच वीजवाहिन्या भूमिगत करण्याच्या मागणीचा गांभीर्याने विचार करून त्याबाबत आवश्यक निर्णय घ्यावा. नागरिकांना वारंवार वीजपुरवठ्याच्या समस्येला सामोरे जावे लागू नये, यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करणे गरजेचे आहे. आता महावितरण या समस्येकडे किती गांभीर्याने लक्ष देते आणि बोराटेवस्तीतील नागरिकांना दिलासा देण्यासाठी कोणती पावले उचलते, याकडे परिसरातील रहिवाशांचे लक्ष लागले आहे.

धक्का लागल्याच्या कारणावरून रिक्षाचालकाला दगड-विटांनी ठेचले!

» पिंपरी | प्रतिनिधी

धक्का लागल्याच्या क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादातून तीन अनोळखी व्यक्तींनी रिक्षाचालकासह त्याच्या दोन मित्रांना बेदम मारहाण केल्याची घटना चिखलीतील कुदळवाडी येथे घडली. आरोपींनी रिक्षाचालक शुभम काळे यांच्या डोक्यात दगड आणि विटांनी मारहाण करून त्यांना जखमी केले. तसेच त्यांच्या रिक्षाची काच फोडून नुकसान केले. याप्रकरणी चिखली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुभम जयदत्त काळे (वय ३२, रा. घरकुल, चिखली) हे २३ ऑक्टोबर रोजी रात्री बाराच्या सुमारास कुदळवाडी ब्रिजजवळील साई बार अँड रेस्टॉरंट येथे जेवणाचे पार्सल घेण्यासाठी गेले होते. त्यावेळी त्यांच्यासोबत मित्र केतन गायकवाड आणि अविनाश हजारे हेही होते. तेथे तीन अनोळखी व्यक्तींनी धक्का लागल्याच्या कारणावरून त्यांच्याशी वाद घातला.

वादाचे रूपांतर मारहाणीत झाले. आरोपींनी शुभम काळे आणि त्यांच्या मित्रांना शिवीगाळ करत हाताने, लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी एका आरोपीने काळे यांच्या डोक्यात दगड मारला, तर इतर आरोपींनी त्यांना खाली पाडून मारहाण केली. या हल्ल्यात काळे जखमी झाले. आरोपींनी त्यांच्या रिक्षाची काचही फोडली.

या प्रकरणातील तीनही आरोपी अनोळखी असून, त्यांच्याविरोधात चिखली पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. तक्रारीनुसार, एका आरोपीने काळ्या रंगाचा शर्ट घातला होता. त्याचे वय अंदाजे १९ ते २० वर्षे असून, त्याने काळे यांच्या डोक्यात दगड मारल्याचे नमूद आहे. अन्य दोन आरोपी अंदाजे ३० वर्षांचे असून, त्यांनी पांढऱ्या रंगाचे शर्ट घातले होते. त्यांनी काळे यांना खाली पाडून लाथा-बुक्क्यांनी मारहाण केल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

राष्ट्रीय एकता बाईक रॅलीचे पिंपरी-चिंचवडमध्ये जल्लोषात स्वागत!

ढोल-ताशांचा गजर, पुष्पवृष्टीने रायडर्सचे स्वागत; १०० पोलिसांचा रॅलीत सहभाग

>> पिंपरी | प्रतिनिधी

राष्ट्रीय एकता, देशाची अखंडता आणि अंमली पदार्थांविरोधात जनजागृतीचा संदेश देत दक्षिण भारतातून सुरू झालेल्या राष्ट्रीय एकता बाईक रॅलीचे पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत उत्साहात स्वागत करण्यात आले. रावेत येथील डी. वाय. पाटील महाविद्यालयाच्या परिसरात ढोल-ताशांचा गजर आणि पुष्पवृष्टी करून विविध राज्यांतून आलेल्या बाईक रायडर्सचे स्वागत करण्यात आले. या रॅलीत पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील १०० बाईक रायडर्सनी सहभाग नोंदविला.

पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रीय एकता, बंधुभाव आणि नशामुक्त भारताचा संदेश युवकांपर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. रॅलीचे महाविद्यालय परिसरात आगमन होताच उपस्थितांनी जल्लोषात रायडर्सचे स्वागत केले.

यावेळी पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या वतीने पोलीस सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर यांच्या हस्ते विविध राज्यांतून आलेल्या रायडर्सना स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. त्यानंतर डॉ. महावरकर यांनी हिरवा झेंडा दाखवून रॅलीला पुढील प्रवासासाठी रवाना केले.

या कार्यक्रमाला पोलीस उपआयुक्त (गुन्हे) रोहिदास पवार, पोलीस उपआयुक्त (परिमंडळ-१) संदीप आटोळे, पोलीस उपआयुक्त (परिमंडळ-२) प्रदीप जाधव, पोलीस उपायुक्त (वाहतूक) विक्रांत देशमुख, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे-२) सचिन कदम यांच्यासह अंमली पदार्थविरोधी पथकातील अधिकारी व अंमलदार, विविध राज्यांतील बाईक रायडर्स आणि महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.

दक्षिण भारतातून सुरू झालेली ही बाईक रॅली देशाच्या विविध भागांतून प्रवास करत आहे. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त ३१ ऑक्टोबर रोजी ही रॅली केवडिया, एकतानगर येथे पोहोचणार आहे. देशाची एकता आणि अखंडता जपण्यासोबतच समाजात बंधुभाव वाढविणे आणि युवकांना अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत जागरूक करणे, हा या रॅलीचा उद्देश आहे.

'अंमली पदार्थांना नाही, जीवनाला हो!' हा संदेश देत पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वतीने सर्व रायडर्सना पुढील प्रवासासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या उपक्रमामुळे राष्ट्रीय एकता आणि नशामुक्त भारताचा संदेश युवकांपर्यंत पोहोचविण्यास हातभार लागला.

नशामुक्त भारताचा संदेश!

राष्ट्रीय एकता बाईक रॅलीच्या माध्यमातून देशाची एकता, अखंडता आणि बंधुभावाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. त्याचबरोबर युवकांमध्ये अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती करून त्यांना व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन केले जात आहे. विविध राज्यांतील बाईक रायडर्सच्या सहभागातून देशाच्या विविधतेतील एकता अधोरेखित होत आहे. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त ३१ ऑक्टोबर रोजी केवडिया, एकतानगर येथे पोहोचणाऱ्या या रॅलीतून राष्ट्रीय एकात्मतेची भावना अधिक दृढ करण्याचा प्रयत्न केला जात आहे. 'अंमली पदार्थांना नाही, जीवनाला हो!' हा संदेश देत सशक्त, निरोगी आणि नशामुक्त भारत घडविण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

वायसीएममध्ये पोलिसालाच धक्काबुक्की; तिघांना अटक!

>> पिंपरी | प्रतिनिधी

पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात (वायसीएम) डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांशी हुज्जत घालून गोंधळ करणाऱ्या तिघांनी कर्तव्यावर असलेल्या पोलीस हवालदाराला धक्काबुक्की केली. तसेच त्यांची गचुंडी धरून बाजूला ढकलत लोखंडी कड्याने मारहाण करण्याचा प्रयत्न केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकारात पोलीस हवालदार अमोल शिंदे जखमी झाले असून, संत तुकारामनगर पोलिसांनी तिघांना अटक केली आहे.

ही घटना शुक्रवार आणि शनिवारच्या मध्यरात्री साडेचारच्या सुमारास पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात (वायसीएम) घडली. वैभव साळुंखे, कुशल गोयल आणि सोहेल शेख हे तिघे आपल्या एका मित्राला उपचारासाठी रुग्णालयात घेऊन आले होते. यावेळी रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी त्यांनी हुज्जत घालण्यास सुरुवात केली. तसेच आरडाओरडा करून गोंधळ घातल्याने रुग्णालयातील नियमित कामकाजात अडथळा निर्माण झाला. रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाइकांना शांततेत सेवा मिळणे अपेक्षित असताना, या प्रकारामुळे रुग्णालयाच्या परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

दरम्यान, रुग्णालयात कर्तव्यावर असलेले पोलीस हवालदार अमोल शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पुढाकार घेतला. त्यांनी संबंधित तिघांना शांत राहण्यास सांगितले आणि रुग्णालयात गोंधळ न घालण्याबाबत समज दिली. मात्र, पोलिसांनी समज दिल्याचा राग मनात धरून आरोपींनी त्यांच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली. त्यानंतर आरोपींनी पोलिसांना शिवीगाळ करत धक्काबुक्की केली. कर्तव्य बजावत असलेल्या पोलिसांशीच अशा प्रकारे वाद घालून त्यांना धक्काबुक्की केल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली. गचुंडी धरून ढकलले; लोखंडी कड्याने मारहाणीचा प्रयत्न वाद वाढल्यानंतर आरोपींनी पोलीस हवालदार अमोल शिंदे यांच्या गळ्याला पकडून त्यांची गचुंडी धरली आणि त्यांना बाजूला ढकलले. एवढ्यावरच न थांबता, आरोपींनी हातातील जाड लोखंडी कड्याने त्यांना मारहाण करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. या झटापटीदरम्यान शिंदे यांच्या पायाला तसेच डोळ्याजवळ दुखापत झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याशिवाय आरोपींनी त्यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे. रुग्णालयातील परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी गेलेल्या पोलिसांनाच अशा प्रकारे लक्ष्य करण्यात आल्याने या घटनेचे गांभीर्य वाढले.

रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या तरुणांनी डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांशी हुज्जत घालण्यासोबतच पोलिसांशीही वाद घातला. त्यानंतर कर्तव्यावर असलेल्या पोलीस हवालदाराला धक्काबुक्की करून जखमी केल्याचा प्रकार समोर आल्याने परिसरात खळबळ उडाली. रुग्णालयासारख्या महत्त्वाच्या ठिकाणी आरडाओरडा करणे, वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या कामात अडथळा आणणे आणि पोलिसांशी झटापट करणे यामुळे या घटनेची गंभीर दखल घेण्यात आली.

‘सोमेश्वर’कडून शेतकऱ्यांना 60 कोटींची दिवाळीभेट!

ऊस उत्पादकांना ६०.११ कोटींचे वाटप; कामगारांनाही बोनस, वेतनवाढीचा फरक

» पुणे | प्रतिनिधी

सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याने ऊस उत्पादक शेतकरी आणि कामगारांसाठी दिवाळीच्या पार्श्वभूमीवर आर्थिक लाभ जाहीर केले आहेत. सन २०२५-२६ च्या गाळप हंगामातील उर्वरित ऊसदरापोटी सभासद व बिगरसभासद शेतकऱ्यांना ६०.११ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. तसेच कार्यक्षेत्राबाहेरील ऊस उत्पादकांना ९६ लाख रुपये देण्यात आले आहेत. यामुळे शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि खासदार पार्थ पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या दरानुसार नोव्हेंबर ते जानेवारीदरम्यान गाळप होणाऱ्या उसाला प्रतिटन ३ हजार ८०० रुपये, फेब्रुवारीतील उसाला ३ हजार ९०० रुपये, तर मार्चमधील उसाला प्रतिटन ४ हजार रुपये दर निश्चित केला होता. यापूर्वी शेतकऱ्यांना प्रतिटन ३ हजार ३०० रुपये पहिली उचल आणि अनुदानाची रक्कम देण्यात आली होती. आता उर्वरित प्रतिटन ५०० रुपयांप्रमाणे एकूण ६० कोटी ११ लाख रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यांवर वर्ग करण्यात आले आहेत. त्यामुळे दिवाळीच्या पार्श्वभूमीवर ऊस उत्पादकांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे.

याशिवाय, कारखान्याने सन २०२०-२१ मध्ये प्रतिटन २०० रुपयांप्रमाणे कपात केलेली ठेव आणि त्यावरील व्याजाची रक्कम मिळून एकूण २४ कोटी १५ लाख रुपये सभासदांच्या खात्यांवर जमा केले आहेत. तसेच सन २०२३-२४ मधील ठेवींवरील व्याजापोटी आणखी ४ कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले आहे. त्यामुळे सभासदांना दिवाळीच्या काळात अतिरिक्त आर्थिक लाभ मिळणार आहे.

शेतकऱ्यांसोबतच कारखान्याच्या कामगारांची दिवाळीही गोड करण्यासाठी प्रशासनाने विविध आर्थिक लाभ जाहीर केले आहेत. कारखान्याच्या कायमस्वरूपी आणि हंगामी कामगारांना १५ टक्के बोनस ॲडव्हान्सपोटी ३ कोटी ३३ लाख रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच रोजंदारी आणि प्रशिक्षणार्थी कामगारांना प्रत्येकी ८ हजार ५०० रुपयांची दिवाळीभेट देण्यात येणार आहे. यासाठी २९ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

याशिवाय, कामगारांना वेतनवाढीच्या फरकाचा पहिला हप्ता म्हणून १ कोटी ८४ लाख रुपये, तर रजेच्या पगारापोटी २८ लाख रुपये देण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे कारखान्याच्या कामगारांनाही सणासुदीच्या काळात आर्थिक आधार मिळणार आहे.

दरम्यान, सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचा सन २०२६-२७ चा गाळप हंगाम १५ ऑक्टोबरपासून सुरू झाला आहे. चालू हंगामात आजअखेर ६१ हजार ५२० मेट्रिक टन उसाचे गाळप पूर्ण झाले असून, त्यातून ५४ हजार ३५० क्विंटल साखरेचे उत्पादन झाले आहे. यंदाच्या हंगामात ३८ हजार ५०० एकर क्षेत्रावरील उसाचे गाळप करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यातून १२ ते १२.५० लाख मेट्रिक टन उसाचे गाळप करण्याचे उद्दिष्ट कारखान्याने निश्चित केले आहे.

गाळप हंगाम सुरळीत आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी सभासद कारखाना प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन कारखान्याचे कार्यकारी संचालक राजेंद्र यादव यांनी केले आहे.

खेडमध्ये भरधाव मोटार-दुचाकीची युवतींच्या घोळक्याला धडक

» पुणे | प्रतिनिधी

महाविद्यालयात जाण्यासाठी बसची वाट पाहत उभ्या असलेल्या विद्यार्थिनींच्या घोळक्यात भरधाव मोटार आणि दुचाकी घुसल्याने खेड तालुक्यातील कुरकुंडी फाटा येथे भीषण अपघात झाला. शुक्रवारी सकाळी आठच्या सुमारास पाईट-खेड रस्त्यावर घडलेल्या या दुर्घटनेत अदिती नवनाथ राळे (वय १९, रा. कुरकुंडी) या युवतीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर सात विद्यार्थिनी आणि दुचाकीवरील दोन तरुण असे एकूण नऊ जण गंभीर जखमी झाले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, अपघातानंतर मोटारचालक घटनास्थळावरून फरार झाला.

या अपघातात वैष्णवी चंद्रकांत भोकसे (वय १९), संघनी नीलेश भोकसे (वय १९), वैष्णवी संतोष जाधव (वय २०), गायत्री विठ्ठल कोळेकर (वय १९), पूजा भगवान घोडके (वय १९), संजना सुधीर राळे (वय १९) आणि अनुष्का नवनाथ राळे (वय १७, सर्व रा. आसखेड, ता. खेड) या विद्यार्थिनी जखमी झाल्या आहेत. तसेच दुचाकीवरील रोहन गारगोटे आणि ओंकार नेहरे (दोघेही रा. कडूस, ता. खेड) हेही गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना उपचारांसाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

नेहमीप्रमाणे राजगुरुनगर येथे शिक्षणासाठी जाण्यासाठी या विद्यार्थिनी कुरकुंडी फाटा येथील बसथांब्यावर थांबल्या होत्या. त्याच वेळी पाईट-खेड रस्त्यावरून एमएच १२ व्हीजी १९७७ क्रमांकाची मोटार भरधाव वेगाने येत होती. दरम्यान, कुरकुंडी गावातून कडूसच्या दिशेने निघालेल्या एमएच १४ एमडब्ल्यू ३७९२ क्रमांकाच्या दुचाकीने अचानक रस्त्यावर वळण घेतले. दुचाकीला वाचवण्याच्या प्रयत्नात मोटारचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याचे सांगण्यात येत आहे.

नियंत्रण सुटलेली मोटार आणि दुचाकीची धडक झाल्यानंतर दोन्ही वाहने रस्त्याच्या कडेला बसची वाट पाहत उभ्या असलेल्या विद्यार्थिनींच्या घोळक्यात घुसली. अचानक झालेल्या या धडकेत विद्यार्थिनी आणि दुचाकीवरील तरुण रस्त्यावर फेकले गेले.

अपघातानंतर घटनास्थळी एकच गोंधळ उडाला. स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेत जखमींना रुग्णालयात पोहोचवले. मात्र, उपचार सुरू असताना अदितीचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती पोलिस पाटील वैशाली भोकसे यांनी दिली.

मालक पोलिसांच्या ताब्यात

अपघातानंतर मोटारचालक प्रमोद वसंत चाटे (वय ३२, रा. आळंदी, ता. खेड) हा घटनास्थळावरून फरार झाला. मोटारमालक विकास हिरामण कराड (रा. आळंदी, ता. खेड) याला उत्तर महाळुंगे एमआयडीसी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. फरार मोटारचालकाचा शोध घेण्याची मागणी मृत युवतीच्या कुटुंबीयांनी आणि नातेवाइकांनी केली.

शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीशी मोटारीचा संबंध?

अपघातग्रस्त मोटारीत शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीतील एका उमेदवाराचा बूथ प्रतिनिधी प्रवास करत असल्याची माहिती समोर आली आहे. हा प्रतिनिधी पाईट मतदान केंद्राकडे घाईने जात असल्याने अपघात घडल्याची चर्चा प्रत्यक्षदर्शींमध्ये होती.

मात्र, अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, पोलिस तपासानंतरच वस्तुस्थिती समोर येणार आहे.

पोलिसांच्या कारवाईवरून ग्रामस्थांमध्ये नाराजी

अपघाताचे ठिकाण उत्तर महाळुंगे एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीत आणि पाईट पोलिस चौकीच्या अंतर्गत येते. अपघातग्रस्त मोटार घटनास्थळी पंचनामा न करताच पोलिसांनी ताब्यात घेऊन पाईट पोलिस चौकीकडे नेल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. या कारवाईवरून ग्रामस्थ आणि पोलिसांमध्ये वाद निर्माण झाला.

दरम्यान, नातेवाइकांनी कोये हद्दीत मोटार अडवली. यावेळी पोलिस आणि नातेवाइकांमध्ये शाब्दिक चकमक झाली.